RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ९, अंक ५] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २-८, २०२३/माघ १३-१९, शके १९४४ [पृष्ठे ०७, किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण सूचना व जाहिराती

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

**IN INSOLVENCY**

The Debtors hereunder mentioned have been adjudged Insolvents in Insolvency Petition No. 8 of 2020 as on 6th January, 2023 by the Hon'ble Insolvency Court.

**INSOLVENCY PETITION No. 8 OF 2020**

*Re*.— 1. Mr. Santosh Kumar Kabra,
Adult : Indian Inhabitant,
Residing at Flat No. A-402,
Fourth Floor, Jiten Co-op. Hsg. Soc. Ltd.,
J. P. Road, Andheri (West),
Mumbai 400 058.

2. Mrs. Sushila Devi Kabra,
Adult : Indian Inhabitant,
Residing at Flat No. A-402,
Fourth Floor, Jiten Co-op. Hsg. Soc. Ltd.,
J. P. Road, Andheri (West),
Mumbai 400 058.

.................Debtors.

The Petition was presented to this Hon'ble Court on 22nd January, 2020 by Arpan Leasing Company Limited.

..........Petitioning Creditor.

Dated this 19th day of January, 2023.

D. R. TALEKAR,
*I/c.* Insolvency Registrar,
High Court, Bombay.

**मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मधील महापालिका उप सचिव पदासाठी विहित केलेल्या अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीत सुधारणेस शासन मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-११२२/प्र.क्र.१०४/नवि-२८**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २५ जानेवारी, २०२३.

वाचा:- १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. मिभाम-१११६/प्र.क्र.३६ (भाग-१)/१६/नवि-२८, दि.२६.०२.२०१९.
२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. मिभाम-१११६/प्र.क्र.३५/१६/नवि-२८, दि.२८.०५.२०१९.
३) मिरा-भाईंदर महानगरपालिका महासभा ठराव क्र. २७, दि.०३.०८.२०२२.
४) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र. मनपा/आस्था/१२४९/२०२२-२३, दि.०७.०९.२०२२.
५) नगर विकास विभाग, शासन निर्णय, क्र. मिभाम-१११६/प्र.क्र.३५/नवि-२८, दि.२५.११.२०२१.

**प्रस्तावना:-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम,२०१९ यांस संदर्भीय क्र. २ येथील, दि.२८.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर सेवाप्रवेश नियमात पदोन्नतीसाठी निम्न संवर्गातील सेवेची ५ वर्षाची अट आहे. राज्य शासनामध्ये साधारणत: पदोन्नतीसाठी पात्र होण्यासाठी निम्न संवर्गातील पदावर ३ वर्षे अनुभवाची अट आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये सुधारणा करण्यात येऊन, पदोन्नतीसाठी निम्न संवर्गातील पदावर ३ वर्षे अनुभवाची अट ठेवण्यास, मिरा-भाईंदर महानगरपालिका, सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ चा सुधारित भाग नियमांस, संदर्भ क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये मंजूर केलेल्या 'महापालिका उप सचिव' या पदावरील नामनिर्देशन/सरळसेवेसाठी असलेले प्रमाण १००% ऐवजी, नामनिर्देशन/सरळसेवा-५०% व पदोन्नती-५०% अशी सुधारणा करण्याबाबत, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.०७.०९.२०२२ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये 'उप सचिव' या संवर्गातील १ पद उपलब्ध असून, सदर पद सरळसेवेने भरण्याबाबत सेवा प्रवेश नियामत तरतूद करण्यात आलेली आहे. सदर पद महानगरपालिकेच्या ठरावानुसार व प्रस्तावानुसार पदोन्नतीने भरण्यासंदर्भात, महानगरपालिकेच्या सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मधील तरतूदी पाहता, संदर्भीय दि.२८.०५.२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-२" मध्ये क्र. ९८ वर, 'महापालिका उप सचिव' (श्रेणी-२, प्रशासकीय

शासन निर्णय क्रमांकः **मिभाम-११२२/प्र.क्र.१०४/नवि-२८**

सेवा) या नमूद पदाच्या नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीसंदर्भात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

संदर्भीय दि.२८.०५.२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-२" मधील क्र. ९८ येथील 'महापालिका उप सचिव' (श्रेणी-२ प्रशासकीय सेवा) संवर्गाच्या अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५४, ४५५ व ४६५(१)(ल) अन्वये प्राप्त अधिकारात, मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील 'प्रशासकीय सेवा' या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व नामनिर्देशनासाठी विहीत केलेली स्तंभ ४ मधील, अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने, महापालिका उप सचिव (श्रेणी-२, प्रशासकीय सेवा) यामध्ये नियुक्ती करता येईल, ही अट ठेवण्यात येऊन, महापालिका उप सचिव पदासाठी सेवा प्रवेश नियमात, नामनिर्देशन/सरळसेवेसाठी असलेले प्रमाण १००% ऐवजी पदोन्नती-१००%, पदोन्नतीने पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पद नामनिर्देशनाने/सरळसेवेने भरावे, अशी सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. महापालिका उप सचिव पदावरील पदोन्नतीसाठीच्या अर्हतेत सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-२, अनुसूची-क" अन्वये सुधारणेस मंजूरी देण्यात येत आहे.

२. या नियमास "मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९" चा सुधारित भाग असे संबोधण्यात यावे.

३. सदर सुधारित नियम, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी तात्काळ शासन राजपत्रात प्रसिध्द करावेत. हे नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. या आदेशानुषंगीक सर्व सांविधानिक बाबींची पूर्तता आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी करावयाची आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०१२५१७३३२७३९२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2023.01.25 17:37:23 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.
३) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) उप सचिव (नवि-२८), यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) निवडनस्ती ( नवि-२८ ).

शासन निर्णय क्रमांकः **मिभाम-११२२/प्र.क्र.१०४/नवि-२८**

**शा.नि.क्र.मिभाम-११२२/सं.क्र.१४१८/प्र.क्र.१०४/नवि-२८, दि. २५ जानेवारी,२०२३ सोबतचे "परिशिष्ट-२, अनुसूची-क"**

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | सध्याची तरतूद | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन/ पदोन्नतीकरीता प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | महापालिका उप सचिव (श्रेणी-२, प्रशासकीय सेवा) | नामनिर्देशन/ सरळसेवा- १००% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकीय कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | पदोन्नती-१००% |
| | | | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी.<br>ब) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रशासकीय कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>- पदोन्नतीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पद सरळसेवेने/नामनिर्देशनाने भरता येईल. | नामनिर्देशन/ सरळसेवा- |

*************************************************

**विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी**

पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा, जि. बुलडाणा

नमुना नं. १८

**स्थावर मालमत्तेसंबंधी जप्ती आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१, नियम १०७ (१०)

क्रमांक वि.व.अ./कव./१७५/२०२३.

ज्याअर्थी, अध्यक्ष, पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा, जि. बुलडाणा यांनी महाराष्ट्र सहकारी अधिनियम, १९६० कलम १५६ अन्वये वसुली प्रमाणपत्र क्र. १४८३, दिनांक ८ सप्टेंबर २०२२ चे आधारावर **गणेश किराणा अॅन्ड जनरल प्रो.प्रा. राजेंद्र भिवसन कायंदे, रा. आदर्श कॉलनी, दे. राजा** तहसील **देऊळगांव राजा**, जि. **बुलडाणा** यांचेकडील थकबाकी रु. **५५६०००** व्याज दिनांक १ एप्रिल २०२२ पासून भरणा तारखेपर्यंत तसेच सरचार्ज नो.फी. वसुली खर्च करण्याबाबत व त्याची अंमलबजावणी त्यांची खालील मालमत्ता जप्त करून विक्री करण्याबाबत अर्ज केलेले आहे.

त्याअर्थी मी, वि. र. पांगारकर विशेष वसुली-विक्री अधिकारी, पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा महाराष्ट्र सहकारी नियम १९६१ नियम १०७ (१०) अन्वये मा. जिल्हा उप निबंधक साहेब सहकारी संस्था, बुलडाणा अधिकार प्रदान आदेश क्र. २०९७/२०२२, दिनांक ३० मार्च २०२२ अन्वये कलम १५६ म. राज्य सह. कायदा, १९६० खाली दर्शविलेली मालमत्ता जप्त केलेली आहे. आणि या आदेशानंतर सदर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण करण्यात आले असेल किंवा तिच्यावर कोणताही भार ठेवण्यात किंवा निर्माण करण्यात आला असेल तर त्या सर्व बाबी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा चे बाबतीत रद्द होतील व निरर्थक ठरतील.

**मालमत्तेचे वर्णन**

| प्रमाणपत्र क्रमांक, तारीख (१) | थकबाकीदाराचे नाव व गाव (२) | घर नंबर किंवा शेताचा भूमापन क्रमांक व वर्णन (३) | चतुःसीमा (४) | शेरा मालमत्तेवरील बोजा (५) |
|---|---|---|---|---|
| **जा.क्र.सनिदे/वि-१/१४८३/२०२२ दिनांक ८ सप्टेंबर २०२२ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, देऊळगांव राजा** | **गणेश किराणा अॅन्ड जनरल प्रो. प्रा. राजेंद्र भिवसन कायंदे, रा. आदर्श कॉलनी, दे. राजा, ता. देऊळगांवराजा, जि. बुलडाणा.** | **मौजे उंबरखेड, ता. दे. राजा, जि. बुलडाणा येथील (१) ग्रा.पं. हद्दीतील मालमत्ता क्र. जुना-३५३, नवीन-४५५ क्रमांकाचा खुला प्लॉट श्री रामदास भिवसन कायंदे व सौ. कावेरी रामदास कायंदे यांची जागा (२) उंबरखेड ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र. १७७ राजेंद्र भिवसन कायंदे व सौ. ज्योती राजेंद्र कायंदे यांची जागा** | (१)<br>पुर्वेस : **सरकारी रस्ता**<br>पश्चिमेस : **विष्णु सोनुने यांची जागा**<br>उत्तरेस : **गावठाणाची जमीन**<br>दक्षिणेस : **अर्जुनराव जानराव कायंदे यांची जागा**<br>(२)<br>पुर्वेस : **गणेश भिवसन कायंदे**<br>पश्चिमेस : **सरकारी रस्ता**<br>उत्तरेस : **अर्जुन जानराव कायंदे**<br>दक्षिणेस : **सरकारी रस्ता** | पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा चे थकीत कर्जापोटी जप्त. |

(१) वरील पूर्ण रकमेची व्याजासहीत व इतर खर्चासहीत या आदेशाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत वसूल परतफेड न केल्यास वरील जप्त केलेली मालमत्ता जाहिर दवंडी देऊन व प्रसिद्धी होऊन विकण्यात येईल.

**देऊळगांव राजा,**
दिनांक २५ जानेवारी २०२३.

**वि. र. पांगारकर,**
विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी,
पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांव राजा,
जि. बुलडाणा (महाराष्ट्र).

## उस्मानाबाद जिल्हा परिषद, उस्मानाबाद

### अधिसूचना

क्रमांक जिपउ/साप्रवि/महसूल/सीआर-०३/२०२२

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम १४२ खाली महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदेचे वार्षिक प्रशासन अहवाल तयार करण्यासंबंधी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल प्रसिद्ध करणे) नियम, १९६४ तयार करून त्यात वारंवार सुधारणा केल्या आहेत.

सदर नियमाखाली उस्मानाबाद जिल्हा परिषदेचा सन २०२१-२०२२ चा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करून त्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ५, दिनांक २९ डिसेंबर २०२२ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर अहवाल उक्त नियमावलीच्या नियम क्रमांक ९ खाली जनतेच्या माहितीस्तव प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उस्मानाबाद,
दिनांक १७ जानेवारी २०२३.

**राहूल गुप्ता** (भा.प्र.से),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.